# पोलीस अधीक्षक कार्यालय, अमरावती ग्रामीण

कॅम्प रोड , अमरावती, पिन – ४४४६०२, महाराष्ट्र

संपर्क – ०७२१- २६६५९३६, ई-मेल – sp.amravati.amr@mahapolice.gov.in


---

## विशेष पोलीस वार्तापत्र

दि.24/06/2024

### शेअर मार्केटचे नावावर 74,19,450 /- रुपये ऑनलाईन फसवणुक प्रकरणात 09 आरोपीनां अटक केल्याबाबत...

पोस्टे मंगरुळ चव्हाळा येथे फिर्यादी नामे सुमित्रा गजानन भाकडे वय ४० वर्ष रा. पापड, मंगरुळ चव्हाळा जि. अमरावती ही सोशल मिडियावर काही मजकुर बघत असतांना तिला एक इनवेस्टमेंट करीता जाहिरात सोशल मिडियावर दिसुन आले तिने त्यावर क्लिक केले असता ती आरोपींनी लोकांच्या फसवणुकी करीता निर्माण केलेल्या Skyrim Capitali व LRO INVESTMENT DiscussionGroup 515 WhatsApp नावाने शेअर मार्केट व्हॉटसअॅप ग्रुपवर रिडायरेक्ट झाली. सदर गृपवर शेअर मार्केट संबंधी माहिती व ऑनलाईन क्लास सुदधा घेतल्या जात होते. सदर गृपमध्ये Institutional Account उघडण्याकरीता LINK पाठविण्यात आली होती. त्याव्दारे फिर्यादीने institutional Account open केले व Treding करीता त्या दोन्ही अकाउंट मध्ये नोव्हेंबर 2023 ते 2024 स्वत:चे वेगवेगळया बँक खात्यामधुन एकुण 74,19,450 /- रुपये पाठविले. त्यानंतर फिर्यादी हे त्यांनी सांगितल्या प्रमाणे शेअर खरेदी व विक्री करीत होते व त्यावर होणारा नफा फिर्यादीला त्यांचे Institutional Account मध्ये दिसत होता. फिर्यादी यांनी Institutional Acc0ount मधुन पैसे withdraw करण्याचा प्रयत्न केला परंतु पैसे Withdraw न झाल्याने फिर्यादी यांनी Customer care क्रमांकावर संपर्क केला असता तो बंद येत होता वरुन आपली फसवणुक झाल्याचे फिर्यादी यांचे लक्षात आल्याने त्यांनी पोलीस स्टेशन मंगरुळ चव्हाळा येथे अपराध क्र.८९/२०२४ कलम ४१७, ४२० भा.द.वी. सहकलम ६६ (ड) माहीती तंत्रज्ञान कायदा २००० अन्वये गुन्हा नोंदविला.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेता मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद व मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. पंकज कुमावत, यांचे मार्गदर्शनाखाली पो.स्टे. सायबर पोलीस निरिक्षक श्री. धिरेंद्रसिंग बिलवाल व सायबर टीमने फसवणूक करणा-या टोळीचे तांत्रिक बाबींचे विश्लेशन केले असता असे लक्षात आले कि, आरोपी वेगवेगळे मोबाईल वापरत असुन व्हॉटसअॅप कॉल व मॅसेजव्दारे आप-आपसात संपर्क करुन तपास यंत्रणेची दिशाभुल करण्यासाठी वेगवेगळया बँकखात्यामध्ये पैसे पाठविले. सदर बँक खात्यांची साखळी जोडुन, मुंबई येथे काही लोकांना विचारपुस केली असता असे समजले की भारताबाहेर विविध देशात बसुन काही व्यक्तींचा समुह संगन्मत करून अशा प्रकारे गुन्हे करण्यास चेतावणी देवून गुन्हयाचा कट करीत आहे. असे तपासात सर्वप्रथम समोर आले. त्यानुसार **सदर गुन्हयात भा.द.वी. कलम 109, 114, 120 ब, 419 हे वाढीव कलम लावण्यात आले**

यात गुन्हे करणारे व त्यांना सहयोग करणारे भारतातील व भारताबाहेरील संशयीत आरोपी हे भारतातील नवयुवक व गरजु लोकांना पैसे कमवीण्याचे आमिश देवून सोशल मिडियादवारे वेगवेगळे आश्वासन

देवून त्यांना विविध बँकेचे बॅक खाते उघडण्यास सांगुन सदर बॅक खाते काही आरोपी एजंट मार्फत चालवुन फिर्यादीचे व भारतभर फसवणुक झालेले पैसे वर्ग करुन सदर रक्कम मुख्य आरोपीं पर्यत पोहचवीण्याचे काम करीत असल्याचे खात्रिशीर माहिती पोलीसांना प्राप्त झाली त्यानुसार मा. पोलीस अधीक्षक साहेब यांचे मार्गदर्शनाखाली खालील सायबर पोलीस पथक मुंबई येथे रवाना करुन स्थानिक पोलीस स्टेशन अंबोली मुंबई शहर यांचे मदतीने मिना हॉटेल इंटरनॅशनल येथे जावून कार्यवाही केली असता मिना हॉटेलच्या सहाव्या मजल्यावर 4 रुम बुक करुन त्यामध्ये भारतभर फसवणुक झालेली रक्कम मुख्य आरोपी पर्यंत पोहचविण्याचे काम करीत होते सदर कामाकरीता भारताच्या विविध राज्यातुन बँक खातेदार व त्यांचे एजेंट हे मुंबई येथे विमानादवारे मुख्य आरोपी व त्यांचे हस्तकामार्फत टिकीट बुक करुन ते मुंबई येथे मिना इंटरनॅश हॉटेज जोगेश्वरी पुर्व येथे येवून वरील प्रमाणे गुन्हा करीत असतांना खालील प्रमाणे आरोपी ताब्यात घेवून त्यांना दि.23/06/2024 रोपी अटक करण्यात आली.

1. सुनिल S/O हनुमान वय – 30 वर्ष रा. जिल्हा फतेहबाद राज्य हरियाणा
2. विक्रम S/O जिलेसिंग वय – 41 वर्ष रा. 104 जिल्हा फतेहबाद राज्य हरियाणा
3. परान अली S/O जमाल उददीन वय – 19 वर्ष रा. जिल्हा कामृप राज्य आसाम.
4. अमन कुमार प्रेमचंद वय – 50 वर्ष रा. जिल्हा – जयपुर राज्य – राजस्थान
5. मो. मरुफ मो. हमीद वय – 24 वर्ष रा उत्तरप्रदेश
6. सौरभ बलींद्रकुमार तिवारी वय – 23 रा. राज्य उत्तरप्रदेश
7. मो. साबिर असुब शेख वय – 19 वर्ष रा. जोगेश्वरी पश्चिम मुंबई
8. फराज खान असिफ खान वय – 19 वर्ष रा. जोगेश्वरी पश्चिम मुंबई
9. विमल मानकलाल काटेकर वय – 31 वर्ष रा. नागपूर

अटक करण्यात आलेल्या आरोपींचे ताब्यातील 18 विविध कंपनीचे मोबाईल, विविध बँकेचे 23 Credit card व Debit card व विविध बॅकेचे एकुण 18 चेकबुक, इंडिगो विमानाचे 06 टिकीट, बॅकेचा 1 प्रॉप्रा स्टँप तसेच एकुण 2,28,000/- रुपये रक्कम ताब्यात घेण्यात आली.

सदरची कार्यवाही ही पो.स्टे. सायबर पोलीस निरिक्षक श्री. धिरेंद्रसिंग बिलवाल, स्था.गु.शा. पो.नि. किरण वानखडे, स.पो.नी. मनीष दुबे, स.पो.उपनि. सुनील बनसोड, पोहवा प्रविण वानखडे, पो.हवा. पंकज गोलाईतकर, पो.ना. अजित राठोड पो.ना. सागर धापड, रितेश गोस्वामी, पो. कॉ. गौरव गनथडे, रोशन लकडे, व संदीप जुगणाके, चैतन गुल्हाणे, रितेश वानखडे, पवन जाधव, अश्विण यादव, पवन ढोके, किशोर धामंदे व सायबर टीमने यांनी केली.

नागरीकाना मा. पोलीस अधीक्षक यांचे तर्फे आवाहन करण्यात येते की, कोणत्याही अनोळखी फोन कॉलवर विश्वास ठेवु नये, कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लीक करु नये. तमेन शेअर मार्केट मध्ये पैसे गुंतवणुकी करीता अज्ञात व्यकतीचा कॉल आल्यास खात्री करुन घ्यावी, पैम गुंतवणुक करीता अनोळखी ॲप वापरु नये. आपल्या बैंक खात्याची, एटीएम/क्रेडिट कार्डची माहिती, अज्ञात मोवाईल धारकला देवू नये. तसेच आपली फसवणुक झाल्यास तात्काळ हेल्पलाईन नंवर १९३० वर कॉल करावा व सायबर पोलीस स्टेशन, अमरावती ग्रामीण येथे संपर्क साधावा.